http://amrutmanthan.wordpress.com/

# मराठी माध्यमाच्या शाळांसाठी राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षातच मराठीची गळचेपी - रामनाथ मोते

सकाळ वृत्तसेवा

Tuesday, January 12, 2010 AT 12:00 AM (IST)

Tags: Sakal, Marathi medium schools, State Government, permission, grant, education policy

कल्याण - राज्यात हजारो मराठी शाळांना मान्यता नाकारण्याचा विषय सध्या गाजत आहे. अनुदान द्यावे लागते यासाठी मान्यता नाकारली जात असेल, तर राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात मराठी भाषेची गळचेपी करण्याचाच हा प्रकार आहे, असा आरोप कोकण विभागीय शिक्षक आमदार रामनाथ मोते यांनी केला आहे. याप्रकरणी राज्य शिक्षक परिषदेतर्फे आंदोलन करण्याचा इशारा आमदार मोते यांनी दिला आहे.

राज्यात कायम विनाअनुदानित तत्वावर प्राथमिक आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सुरू करण्यासाठी खासगी शैक्षणिक संस्थांकडून राज्य सरकारने काढलेल्या परिपत्रकानुसार प्रस्ताव मागविण्यात आले होते. या शाळांच्या प्रस्तावावर शासन स्तरावर निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळाची एक उपसमिती नियुक्त करण्यात आली होती. मराठी माध्यमाच्या जिल्हा स्तरावरील समितीच्या शिफारशीनंतर ते प्रस्ताव राज्याच्या समितीकडे पाठविण्यात आले होते. या प्रस्तावापैकी राज्य सरकारने मराठी माध्यम वगळून इतर माध्यमांच्या शाळांना मान्यता दिली आहे. ज्या संस्थाचालकांनी मराठी माध्यमाच्या शाळेसाठी मागणी केली होती, त्या ठिकाणी आवश्यकता असूनही तसेच मराठी शाळांच्या प्रस्तावाला दोन दोन शिफारशी असूनदेखील मान्यता नाकारण्यात आली आहे. मराठी माध्यमाच्या शाळांना मान्यता नाकारणे हे मराठी भाषेवर अन्याय करण्यासारखे असल्याचे आमदार मोते यांनी सांगितले. महाराष्ट्राचा सुवर्णमहोत्सव साजरा केला जात असताना मराठी माध्यमाच्या शाळांना मान्यता नाकारण्यात आल्या आहेत. राज्य सरकारने याचा पुनर्विचार न केल्यास राज्यातील हजारो शिक्षक राज्यभरात राज्य शिक्षक परिषदेच्या माध्यमातून आंदोलनात उतरतील. राज्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असे शिक्षक परिषदेचे संघटनमंत्री अनिल बोरनारे यांनी सांगितले.